नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:२९/०५/२०२६

पुणे महानगरपालिका
मा. स्थायी समिती
कार्यपत्रिका क्र.१०

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार, दि.०४/०६/२०२६ रोजी, सकाळी ११:३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता मा.स्थायी समिती सभागृह , दुसरा मजला, पुणे महानगरपालिका (नवीन विस्तारित इमारत) येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

घनकचरा व्यवस्थापन आढावा

विषय क्र. २१८

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी १५ क्षेत्रीय कार्यालयाकडील दि.०१/०४/२०२६ ते दि.३०/०४/२०२६ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/घकव्यका/१४१, दि.२७/०५/२०२६ चे पत्र.

उपआयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

विषय क्र. २१९

पुणे महानगरपालिका क्षेत्रीय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालयाचे नियंत्रणखालील औंध-बाणेर, शिवाजीनगर-घोलेरोड व कोथरूड-बावधन क्षेत्रीय कार्यालयांकडील माहे एप्रिल २०२६ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/परि.२/१२८, दि. २५/०५/२०२६ रोजीचे पत्र.

मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. २२०

मा. अमोल बालवडकर व मा. सुहास टिंगरे यांचे दि. २७/०५/२०२६ चे पत्र

पुणे शहरामध्ये निर्माण झालेली कार पार्किंग समस्या पाहता शहरामध्ये विविध ठिकाणी आधुनिक मल्टी लेवल कार पार्किंग स्थळाची गरज आहे.

छत्रपती संभाजी महाराज उद्यान, जंगली महाराज रस्ता येथील जुने व वापरासाठी अयोग्य असलेले मल्टी लेवल पार्किंग स्थळ वापरासाठी पाडण्याचा प्रशासन नियोजन करत आहे.

तरी सदर जागेवर पुन्हा नव्याने आधुनिक Multi level Car Parking स्थळ P.P.P. धोरणानुसार उभारणे ही काळाची गरज आहे.

विषय क्र. २२१

मा. रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम व मा. सुनील यादव शिंदे यांचे दि. २७/०५/२०२६ चे पत्र

पुणे महानगरपालिकेत सद्यस्थितीत दहा हजार पेक्षा जास्त कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. कंत्राटी कामगारांना सामाजिक सुरक्षा पोटी ईपीएफ व ई.एस.आय.सी ची सुविधा देणे क्रमप्राप्त आहे. तथापि इ.एस.आय.सी. च्या योजनेची वेतन मर्यादा 21000/- इतकी असल्याने पुणे महानगरपालिकेत

ठेकेदारामार्फत घेण्यात येणाऱ्या कंत्राटी कामगारांपैकी कुशल व अर्धकुशल कामगारांना 21000 पेक्षा जास्त वेतन असल्याकारणाने इ.एस.आय.सी अंतर्गत वैद्यकीय सुविधा मिळत नाही.

तसेच यथावकाश अकुशल कामगारांची वेतन मर्यादा देखील पुढील सहामाहीत महागाई भत्त्यात वाढ होऊन 21000/- पेक्षा जास्त होणार असल्याने कंत्राटी अकुशल कामगारांना देखील इ.एस.आय.सी अंतर्गत वैद्यकीय सुविधा मिळणार नाही. त्यामुळे सदर 10,000 कंत्राटी कामगार वैद्यकीय योजनेपासून वंचित राहणार आहेत. सदरचे कर्मचारी हे अल्प वेतनावर काम करीत असून व पुणे मनपाच्या कायम सेवकांप्रमाणेच खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. त्यांना मात्र कोणतीही वैद्यकीय सेवा सुविधा मिळणार नाही. तरी पुणे महानगरपालिकेच्या कंत्राटी कामगारांना पुणे महानगरपालिकेच्या अंशदायी सहाय्य योजनेचे सभासदत्व विना शर्त देण्यात यावे.

विषय क्र. २२२

मा. अजित दत्तात्रय घुले व मा. निलेश नारायण निकम यांचे दि. २७/०५/२०२६ चे पत्र

प्रभाग क्र. 15 ड मधील सर्वे नंबर ९३/१अ/१/१अ/५२/९३/१अ/२ येथे पुणे महानगरपालिकेची 'अॅमेनिटी स्पेस' (आरक्षित जागा) उपलब्ध आहे. सध्या या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असून, स्थानिक नागरिक, महिला आणि तरुण विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे. परिसरातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी एक सुसज्ज सार्वजनिक जिम (व्यायामशाळा) असणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच, महिलांच्या आरोग्यासाठी आणि मानसिक स्वास्थ्यासाठी स्वतंत्र योगा हॉल निर्माण करावा, यासोबतच, परिसरात स्पर्धा परीक्षा व इतर शैक्षणिक अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. घरात पुरेशी जागा नसल्यामुळे या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी शांत वातावरण मिळत नाही. यासाठी याच जागेवर एक अद्ययावत अभ्यासिका (स्टडी रूम) सुरू केल्यास विद्यार्थ्यांना त्याचा मोठा फायदा होईल तरी तीन मजली सुसज्ज इमारत होणे अत्यंत आवश्यक आहे. तरी, नागरिकांचे आरोग्य आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता, सदर सर्वे नंबर ९३/१अ/१/१अ/५२/९३/१अ/२ मधील मनपाच्या जागेवर तातडीने जिम, महिला योगा हॉल आणि अभ्यासिका विकसित करण्यात यावी.

माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र.२२३

दिनांक ११/०५/२०२६ ते १७/०५/२०२६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ९० आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/१४२, दि.२७/०५/२०२६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र. २२४

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.३ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०३/२०२६ ते दि.३१/०३/२०२६ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (ड) नुसार मा. अति. महा. आयुक्त (वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (वि) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.३/१२६, दि.२२/०५/२०२६ चे पत्र.

मागील सभेचे विषय

विषय क्र. २२५

३ ते ४ वर्षांची रोपे लागवडीकरिता पुरविणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. जय गणेश डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५९९९९४६/- पेक्षा ६.६६% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु ५६००३४९=६० उपलब्ध रकमे पर्यंत (हॉर्टीकल्चर विषयक देखभाल दुरुस्तीची काम असल्याने भाववाढ सूत्र वगळून काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उद्यान/११, दि. ०८/०४/२०२६ चे पत्र.

(टीप : सदरील विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा असे दि. २७/०५/२०२६ च्या सभेत ठरले होते)

संकीर्ण

विषय क्र. २२६

प्राथमिक शिक्षण विभाग, पुणे महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या ५ शाळा चालविणे करीता द आकांक्षा फौंडेशन या संस्थेने दिलेल्या प्रती विद्यार्थी प्रती वर्ष रक्कम रुपये २५०००/-(अक्षरी - रुपये पंचवीस हजार) इतक्या दरास मान्यता मिळणेस, द आकांक्षा फौंडेशन या संस्थेस कार्यादेश देणेस, द आकांक्षा फौंडेशन यांचेसोबत करारनामा करणेस, सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये बजेट कोड (RE12A162A) SSC/CBSE, इतर बोर्डाच्या इंग्रजी माध्यम शाळा चालविणे (CSR अंतर्गत मनपा हिस्सा) मधून द आकांक्षा फौंडेशन यांना बिल आदा करणेस. व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत कलम ७२'ब' अन्वये आर्थिक दायित्व स्वीकारणेस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्राथमिक/१२७, दि. २५/०५/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २२७

पुणे महानगरपालिका व स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था यांचे संयुक्त विद्यमाने “झिरो वेस्ट कसबा-भवानी “ प्रायोगिक तत्वावरील प्रकल्पास ३ महिने मुदत वाढ मिळणेस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घकव्यका/१४०, दि. २६/०५/२०२६ चे पत्र.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका